# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली
**E-mail** - nhmgadchiroli2021@gmail.com
**Contact No.** 07132-299523


---

आरोग्य सेवा

जा.क्र.NHM/आस्था/ ९५४ /२०२६.
कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.
दिनांक : २४/ २ /२०२६.

## जाहिर आवाहन

गडचिरोली जिल्हयातील राष्ट्रीय आरोग्य अभियानातील पदावर थेट नियुक्ती देण्याचे आमिष दाखवून उमेदवारांकडून पैसे उकडण्यात येत असल्याचे या कार्यालयास निदर्शनास आलेले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कोणतेही पद भरावयाचे असल्यास त्याची रितसर जाहिरात प्रकाशित करुन त्याद्वारे ईच्छूक व अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येते. प्राप्त अर्जांबाबत राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांचेकडून दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करुन निवड केल्या जाते व त्यानूसार उमेदवारांना नियुक्ती दिल्या जाते.

त्यामुळे जिल्हयातील तसेच जिल्हयाबाहेरील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, राष्ट्रीय आरोग्य अभियानातील पदावर थेट नियुक्ती देण्याबाबत कोणत्याही त्रयस्त व्यक्ती किंवा व्यक्ती समुहाद्वारे दिलेल्या भुलथापांना बळी पडू नये. तसेच असे दिसून आल्यास अशा व्यक्ती किंवा व्यक्ती समुहा विरुद्ध कायदेशिर कारवाई करावी किंवा योग्य त्या पुराव्यासह या कार्यालयाशी संपर्क करावा. याउपरही कोणाची फसगत झाल्यास त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

अध्यक्ष (जिल्हा निवड समिती) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner